शिक्षण विभाग प्राथमिक पुणे महानगरपालिका
भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना
शिवाजीनगर पुणे 411 005
जावक क / खाप्राशा 9852
दिनांक 20/4/15

प्रति,
मुख्याध्यापक,
ज्ञानप्रबोधिनी इंग्लिश मिडियम स्कूल
ससाणेनगर, हडपसर, पुणे 28

विषय — कायम विनाअनुदान तत्वावरील षासन मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांच्या नैसर्गीस वाढीच्या वर्गांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ — 1. शासन निर्णय कमांक व्ही एल एस 1002/1000/02 प्राशि 3 दिनांक 23/09/2003
2 मा शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचा दिनांक 3 नोव्हेंबर 2010 चा आदेश

उपरोक्त विषयास अनुसरून ज्ञानप्रबोधिनी इंग्लिश मिडियम स्कूल ससाणेनगर, हडपसर, पुणे या शाळेचा तुकडया नैसर्गीक वाढीचा प्रस्ताव इकडील कार्यालयास प्राप्त झालेला होता. सहा प्रशासकीय अधिकारी यांचे शिफारशीनूसार खालील तक्त्यात दर्शविल्यानूसार उपरोक्त शाळेस, अटी शर्तीस अधिन राहून नैसर्गीक वाढीचे वर्ग मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | नैसर्गीक वाढ सन |
|---|---|---|---|---|
| 1. | ज्ञानप्रबोधिनी इंग्लिश मिडियम स्कूल ससाणेनगर, हडपसर, पुणे 28 | इंग्रजी | इयत्ता 2 री ते इयत्ता 7 वी नैसर्गीक वाढीने | नैसर्गीक वाढ इयत्ता 2 री जून 2011<br>नैसर्गीक वाढ इयत्ता 3 री जून 2012<br>नैसर्गीक वाढ इयत्ता 4 थी जून 2013<br>नैसर्गीक वाढ इयत्ता 5 वी जून 2014<br>नैसर्गीक वाढ इयत्ता 6 वी जून 2015<br>नैसर्गीक वाढ इयत्ता 7 वी जून 2016 |

अटी व शर्ती ——

1. शाळेस शासनाने वेळोवेळी मंजूर केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहीजे.
2. सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील
3. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी
4. शाळेने शासनाकडून वेळोवेळी विहीत केलेला अभ्यासकमाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे
5. मंजूर करण्यात आलेल्या तुकडयांमूळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी
6. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
7. तपासणीअंती अटी शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास आल्यास तुकडी/वर्गमान्यता त्वरीत रदद करण्यात येईल
8. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटींवर सदर मान्यता देण्यात येत आहे
9. आ.टी.ई. ॲक्ट 2009 चे तंतोतंत पालन करणे बंधनकारक राहील

19-6-18

प्रशासकीय अधिकारी,
शिक्षण विभाग प्राथ. पुणे मनपा

महाल... विद्यानिकेतन संस्था
२२ ... नगर, हडपसर, पुणे-२८.

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे - ४११ ००१.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in

# प्रथम मान्यता

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा1/413/2९८४ /2024 पुणे 1 दिनांक: /04/2024
03/05/2024

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
महात्मा फुले विद्यानिकेतन संस्था, ससाणेनगर, हडपसर, पुणे संचालित
ज्ञानप्रबोधिनी इंग्लिश मेडीयम स्कुल, ( 27251700326 ) ससाणेनगर, हडपसर, पुणे 28

विषय - सन 2022-23 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ - 1.शासन निर्णय क्र. प्राशाव-2019/प्र.क्र.132/एसएम-5, दिनांक 17/09/2019 शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई
2.जा.क्र.शिउसं/प्राथ-202/पुवि/2019-20/6622, शिक्षण उपसंचालक पुणे विभाग दिनांक 10/12/2019
3.मुख्याध्यापक यांचेकडील प्रस्ताव दिनांक 13/02/2024
4.श्रीम. मोमीन अस्मा बेगम मोहम्मद इमादोद्दीन, उपशिक्षणाधिकारी, जि.प.पुणे यांचेकडील तपासणी अहवाल 22/04/2024

उपरोक्त संदर्भीय विषयांन्वये कळवण्यात येते की, आपल्या संस्थेने प्रथम मान्यता करीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार व तपासणी अधिकारी यांनी केलेली शिफारशी नुसारआपल्या संस्थेस संदर्भ क्र .1 ते 4 नुसार खालील अटी व शर्तीवर इयत्ता 8 वी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | सुरु वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | महात्मा फुले विद्यानिकेतन संस्था, ससाणेनगर, हडपसर, पुणे | ज्ञानप्रबोधिनी इंग्लिश मेडीयम स्कुल, ( 27251700326 ) ससाणेनगर, हडपसर, पुणे 28 | इंग्रजी | नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित | इयत्ता 8 वी | 2019-20 |

## अटी व शर्ती

1. मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात शासनच्या परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
2. शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.
3. स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमानुसार व विनियमानुसार करण्यात यावी.
4. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतींचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा , मंडळ सलग्नता क्रमांक, UDISE कोड इ. तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन मान्यता पत्र क्र. प्राशाव-2019/प्र.क्र.132/एसएम-5, दिनांक 17/09/2019 मधील सर्व अटी व शर्ती पुर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
11. **भविष्यात या शाळेची प्रथम मान्यता बाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्याय प्रविष्ठ प्रकरण उद्भवल्यास सदरचा प्रथम मान्यता आदेश रद्द करण्यांत येईल.**

( संजय नाईकडे )
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे

Scanned with OKEN Scanner